**शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून राज्यातील विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी विनाअनुदानित संस्थेत नवीन अभ्यासक्रम, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ, इ. साठी फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या परवानगीस अनुसरून शासनाची मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्र.टीईएम-२०२१/प्र.क्र. ११०/तांशि-४**

मादाम कामा रोड, हुतात्मा चौक राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २९ जुलै, २०२१.

<u>वाचा</u> : १) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २/एनजीसी/२०२१/५७५, दिनांक ०१/०७/२०२१.
२) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २/एनजीसी/२०२१/५८८, दिनांक ०६/०७/२०२१.
३) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २/एनजीसी/२०२१/६०९, दिनांक १२/०७/२०२१.
४) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २/एनजीसी/२०२१/६१७, दिनांक १३/०७/२०२१.

<u>प्रस्तावना</u> :

संचालक, तंत्रशिक्षण यांनी वर नमूद क्रमांक १ ते ४ येथील पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून राज्यातील विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थेत नवीन अभ्यासक्रम, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ इ. साठी फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या परवानगीस अनुसरून शासन निर्णय निर्गमित करणे इ.बाबत शासन मान्यता देण्यासाठी प्रस्तावित केले आहे.

संचालक, तंत्रशिक्षण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सोबतच्या Annexure "A" मधील संस्थांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थेत नवीन अभ्यासक्रम, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ इ. साठी फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या परवानगीस अनुसरून मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

VKM/APK
G. R file
03/08/2021

POONA DISTRICT EDUCATION ASSOCIATION'S
Seth Govind Raghunath Sable
College of Pharmacy, Saswad
Inward Letter No:- 291
Date: 03/8/2021

**शासन निर्णय :**

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून संचालक, तंत्र शिक्षण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे, शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ पासून सोबतच्या Annexure "A" मधील संस्थांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे विद्यमान कायम विनाअनुदानित औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ इ.बाबत खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेचे प्रवेश क्षमता वर नमुद केल्याप्रमाणे राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली / फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत . तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

Annexure A

Higher Technical Education Department, Government Resoulation No.TEM-2021/C.R.110/TE-4, Dated- 29 July, 2021.

List of New Course, Increase In Intake in existing Unaided Pharmacy Institute, Approved by PCI for A.Y. 2021-22

| SR. No. | DTE Code | PCI Code | Institute Name | District Name | Region Name | ProgramName | University Name | Course Name | Intake Approved by Govt. A.Y.2020-21 | Intake Approved by PCI A.Y.2021-22 | Variation | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 6376 | PCI-74 | All India Shri Shivaji Memorial Society's College of Pharmacy, Pune | Pune | Pune | Master of Pharmacy | Savitribai Phule Pune University | Pharmacology | 8 | 15 | 7 | Increase Intake |
| 2 | 6376 | PCI-74 | All India Shri Shivaji Memorial Society's College of Pharmacy, Pune | Pune | Pune | Master of Pharmacy | Savitribai Phule Pune University | Pharmacutical Chemistry | 10 | 15 | 5 | Increase Intake |
| 3 | 5478 | PCI-3138 | Rashtriya Shikshan Mandal N N Sattha College Of Pharmacy, Ahmednagar | Ahmadnagar | Nashik | Bachelor of Pharmacy | Dr. Babasaheb Ambedkar Technological University,Lonere | Pharmacy | 60 | 100 | 40 | Increase Intake |
| 4 | 6380 | PCI-1334 | Marathwada Mitra Mandal's College of Pharmacy, Thergaon( Kalewadi),Pune | Pune | Pune | Master of Pharmacy | Savitribai Phule Pune University | Pharmaceutical Quality Assurance | 6 | 15 | 9 | Increase Intake |
| 5 | 6380 | PCI-1334 | Marathwada Mitra Mandal's College of Pharmacy, Thergaon ( Kalewadi) ,Pune | Pune | Pune | Master of Pharmacy | Savitribai Phule Pune University | Pharmacognosy | 6 | 9 | 3 | Increase Intake |
| 6 | 6380 | PCI-1334 | Marathwada Mitra Mandal's College of Pharmacy, Thergaon( Kalewadi),Pune | Pune | Pune | Master of Pharmacy | Savitribai Phule Pune University | Pharmaceutics | 12 | 15 | 3 | Increase Intake |
| 7 | 5189 | PCI-1520 | P.S.G.V.P.M.'s College of Pharmacy, Shahada | Nandurbar | Nashik | Master of Pharmacy | Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon | Pharmceutical Quality Assurance | 6 | 15 | 9 | Increase Intake |
| 8 | 5189 | PCI-1520 | P.S.G.V.P.M.'s College of Pharmacy, Shahada | Nandurbar | Nashik | Master of Pharmacy | Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon | Pharmaceutics | 6 | 15 | 9 | Increase Intake |
| 9 | 6389 | PCI-1693 | K.E. Socities. Rajarambapu College of Pharmacy, Kasegaon, Sangli | Sangli | Pune | Master of Pharmacy | Shivaji University | Pharmceutical Quality Assurance | 6 | 15 | 9 | Increase Intake |
| 10 | 6389 | PCI-1693 | K.E. Socities. Rajarambapu College of Pharmacy, Kasegaon, Sangli | Sangli | Pune | Master of Pharmacy | Shivaji University | Pharmaceutics | 12 | 15 | 3 | Increase Intake |
| 11 | 6389 | PCI-1693 | K.E. Socities. Rajarambapu College of Pharmacy, Kasegaon, Sangli | Sangli | Pune | Master of Pharmacy | Shivaji University | Pharmacutical Chemistry | 12 | 15 | 3 | Increase Intake |
| 12 | 1131 | PCI-2590 | Vidya Bharati College of Pharmacy, Amravati | Amravati | Amravati | Master of Pharmacy | Sant Gadge Baba Amravati University | Pharmacology | 9 | 15 | 6 | Increase Intake |
| 13 | 6372 | PCI-[illegible] | Poona District Education Association's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy , Saswad, Pune | Pune | Pune | Master of Pharmacy | Savitribai Phule Pune University | Pharmacutical Chemistry | 6 | 15 | 9 | Increase Intake |
| 1[illegible] | [illegible]2 | PCI-3222 | Poona District Education Association's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy , Saswad, Pune | Pune | Pune | Master of Pharmacy | Savitribai Phule Pune University | Pharmaceutics | 10 | 15 | 5 | Increase Intake |

९) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲ १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

२. याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

३. ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतीम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये या शासन मान्यतेनुसार अभ्यासक्रमाचा समावेश होण्याकरिता संचालक, तंत्र शिक्षण यांनी आवश्यक ते आदेश पुढील १० दिवसाच्या आत निर्गमित करावेत.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०७२९१२१४५८७२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay Audumbar Dharurkar

Digitally signed by Sanjay Audumbar Dharurkar
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, [illegible]
Date: 2021.07.30 17:42:23 +05'30'

( संजय औ.धारुरकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
३. सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
५. संबंधित संस्था (संचालक,तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६. फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया,कम्बाइन्ड काऊन्सिल बिल्डींग, कोटला रोड, ऐवान-इ-गालिब मार्ग, नवी दिल्ली-११० ००२.
७. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११०००१.
८. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
९. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.
१०.निवड नस्ती/तांशि-४

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच, विद्यमान पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास शासन मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्र.मान्यता-२०२४/प्र.क्र.३५९/तांशि-४**

मादाम कामा रोड, हुतात्मा चौक राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

**दिनांक: ३० सप्टेंबर, २०२४.**

**वाचा** : संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.२/पीसीआय-मान्यता/२०२४-२५/७६६, दि.२३.०९.२०२४.

**प्रस्तावना :** फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच, विद्यमान पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास, शासन मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, तंत्रशिक्षण यांनी वाचा येथील पत्रान्वये शासनास सादर केला आहे. त्यानुषंगाने शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :** फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन व संचालक, तंत्र शिक्षण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे, सोबतच्या प्रपत्रामध्ये दर्शविल्यानुसार विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच, विद्यमान पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती:-

१) सदर मान्यता ही कायम विनाअनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या तसेच दि.२१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

३) शासनाने विहित केलेल्या, तसेच, फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस, संचालक, तंत्र शिक्षण यांच्यासोबत

VKM/APC
File it
Chavan
01/10/2024
POONA DISTRICT EDUCATION ASSOCIATION'S
Seth Govind Raghunath Sable
College of Pharmacy, Saswad
Inward Letter No:- 820
Date:- 01/10/24

करारनामा करावा लागेल. तसेच, आवश्यक कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संगतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार / पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास, त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास शिक्षक, शिक्षकेतर व इतर तांत्रिक कर्मचारी, फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या निकषाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत. वेतन व भत्ते इ. बाबत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून तसेच, संस्थेविरुध्द विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेने आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके फार्मसी कौंसिल ऑफ इंडियाच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच, विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच, फार्मसी कौंसिल ऑफ इंडियाच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९) रॅगिंग संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

१०) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि.२२.०२.२०१८ अन्वये विहित केलेले नोंदणी शुल्क संबंधित महाविद्यालय/संस्थेने भरणा केले नसेल, तर ते संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय यांनी संबंधित महाविद्यालय/ संस्थेकडून भरणा करुन घ्यावे.

११) महाविद्यालयाने/संस्थेने सदर अभ्यासक्रमाकरीता, संबंधित विद्यापिठाचे संलग्नीकरण प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

२. याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील.

३. या शासन मान्यतेनुसार उक्त संस्था / महाविद्यालयातील अभ्यासक्रमांचा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश होण्याकरिता संचालक, तंत्र शिक्षण यांनी आवश्यक ते आदेश निर्गमित करावेत.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०९३०१६३४२६०१०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

THORAT AJITKUMAR ARUNRAO

Digitally signed by THORAT AJITKUMAR ARUNRAO
DN: CN = THORAT AJITKUMAR ARUNRAO, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2024.09.30 16:36:14 +05'30'

(अजितकुमार थोरात)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
३) संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
४) कुलसचिव, संबंधित विद्यापीठ (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
५) संबंधित संस्था (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६) निवड नस्ती/तांशि-४

प्रपत्र

HTED G.R.No.Manyata-2024/C.R.359/TE-4, Dated: 30th September, 2024

List of Increase in Intake , New Course in existing Unaided Pharmacy Institute, Approved by PCI for A.Y. 2024-25

| Sr.No. | DTE CODE | PCI CODE | INSTITUTE NAME | STATUS | PROGRAMME | UNIVERSITY NAME | LEVEL OF COURSE | MAIN COURSE NAME | COURSE NAME | INTAKE APPROVED BY GOVT. A.Y. 2023-24 | INTAKE APPROVED BY PCI A.Y. 2024-25 | VARIATION | REMARKS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 20 | 3504 | PCI-4548 | Raigad College of Pharmacy, Mohopre 402 305 | Un-Aided | PHARMACY | Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmaceutics | 0 | 15 | 15 | New Course |
| | | | | | | | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmaceutical Quality Assurance | 0 | 15 | 15 | New Course |
| 21 | 6943 | PCI-3196 | Vidya Niketan College of Pharmacy, Lakhewadi- 413 103 | Un-Aided | PHARMACY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmaceutics | 0 | 3 | 3 | New Course |
| | | | | | | | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmacology | 0 | 3 | 3 | New Course |
| | | | | | | | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmaceutical Quality Assurance | 0 | 3 | 3 | New Course |
| | | | | | | | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmaceutical Chemistry | 0 | 3 | 3 | New Course |
| 22 | 6372 | PCI - 3222 | Poona District Education Associations Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad, Tal Purandar, Dist.Pune , Saswad rural 412 301 | Un-Aided | PHARMACY | Savitribai Phule Pune University, Pune | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmacognosy | 0 | 3 | 3 | New Course |